# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २३०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यलय, भंडारा
दिनांक ०३/०५/२०१८

**१) मोटार सायकलची चोरी :-**

दिनांक ०१/०५/२०१८ चे १८.३० ते १९.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची मोटार सायकल क्र. एमएच ३६ आर ०८८१ किंमती २०,०००/-रु. हिरो होंडा कंपनीची स्पलेंडर ही सु. बो. दवाखाना तुमसर येथे पार्कीग करुन पेंशटला भेटण्याकरीता गेले असता भेटुन परत आल्यावर फिर्यादीची मोटार सायकल पार्कीग ठिकाणी दिसुन आली नाही. कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन मोटार सायकल चोरुन नेल्याने फिर्यादी प्रशांत गणेश शेंडे वय २५ वर्ष, रा परसवाडा देव्हाडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बावणे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**२) सोन्याचा गोपची चोरी :-**

दिनांक ०१/०५/२०१८ चे १२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही तीचा पुतण्या हेमदेव धुर्वे यांचे लग्न लावण्याकरीता बावनकुळे सभागृह पेट्रोल पंप ठाणा येथे आली असता लग्नातील गर्दी मध्ये कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे गळयातील सोन्याचे गोप १५ ग्रॅम, किंमती २५,०००/-रु. चा चोरुन नेल्याने फिर्यादी श्रीमती लक्ष्मीबाई पतवारु धुर्वे वय ५७ वर्ष, रा राजेन्द्र वार्ड शुक्रवारी भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरगनर येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कांबळे पोलीस स्टेशन जवाहरगनर हे करीत आहेत.

**३) ट्रकच्या धडकेत एकाचा मृत्यु :-**

दिनांक ०१/०५/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील मृतक छेदींलाल तानसिंग दहलवार वय ६५ वर्ष, रा. बोनपट्टा ता. तिरोडी जि. बालाघाट हा आपले मोटार सायकल क्र. एम एच ३१ युबी ३०१४ ने सुंदर टोला गावाकडून बोनपट्टा गावाकडे जात असतांना यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयने व निष्काळजीपणे चालवुन मृतकाचे मोटार सायकलला धडक मारुन मृतकचे मरणास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी कुंजीलाल शिवाजी दरेकर वय ४५ वर्ष, रा बोनकट्टा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २७९,३०४(अ) भादवी. सहकलम १८४/१३४ (ब) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. जाईले पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**४) चारचाकी वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यु :-**

दिनांक ०२/०५/२०१८ चे १०.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने, लापरवाहीने,निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन मोटार सायकल क्रमांक एमएच ३१/ डीओ ०९५९ ला मागेहुन धडक देवुन मृतक सेवकराम श्रीराम ऊईके याचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी जयराम श्रीराम ऊईके वय ४६ वर्ष, रा गागवाडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३०४(अ) भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. ताराम पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**५) सोने चांदीच्या दागीण्यांची चोरी :-**

दिनांक ०१/०५/२०१८ चे २२.०० ते दिनांक ०२/०५/२०१८ चे ०४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे आपले परिवारासह राहत्या झोपडीतील खुल्या दरवाज्याची असलेल्या आलमारीतुन १ सोन्याचे टॉप्स, वजन ३ ग्रॅम, सोन्याचे मंगळसुत्र ४ ग्रॅम, चांदीच्या पायपट्टया ५ तोळे असा एकुण किंमती १६,०००/-रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी रामकृष्ण दिवारु बावणे वय ४५ वर्ष, रा. टाकळी/ भोसा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. लांडगे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**६) सोन्याचे रिंग चोरुन नेल्याचे संशया वरुन गुन्हा नोंद :—**

दिनांक ११/०४/२०१८ चे २२/०४/२०१८ यातील फिर्यादी सौ. साधना सिकंदर ईलमकर वय ४८ वर्ष रा. बिएसएनएल कॉलोनी भंडारा ही कार्यक्रमा निमीत्त घाईघाईने तिचे कानातील सोन्याचे रिंग ४ ग्रॅम किंमती १०,०००/—रु. ज्वेलरी बॉक्स ज्यात बेन्टेक्सचे दागीणे असलेले भित्तीचे कपाटात ठेवुन बाहेर निघुन गेली ते संशयीत्याने चोरुन नेले असावे अश्या फिर्यादीचे तकारीवरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३८१ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**७) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे पायी चालकास धडक देवुन जखमी करण्यास व स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०२/०५/२०१८ चे २०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा लहान भाऊ रोहीत बसुराज खडसे वय २० वर्ष, हा त्याचे बाजुचे पायदळ त्याचे घराकडे जात असता यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल हयगयीने व लापरवाहीने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे भावााला मागेहुन धडक देवुन त्यास जखमी करण्यास व स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी नानेश बसुराज खडसे वय ३५ वर्ष, रा कारधा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**८) कंटेनरच्या धडकेत दोन जखमी :—**

दिनांक ०२/०५/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील कंटेनर ट्रक दारु पिऊन दारुचे नशेत भरधाव वेगाने, निष्काळजीपने धोकादायक रित्या चालवित आणुन कंटेनर समोर जाणाऱ्या ऑटो क. एमएच ३६ एफ ८१२७ ला मागेहुन भिलेवाडा येथे धडक देवुन ऑटो मध्ये बसलेले आकाश गोस्वामी व संगीता मेश्राम हीला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी महेश अशोक वालदे वय २४ वर्ष, रा. डोडमाझरी यांचे तोंडी व जखमीची एमएलसी रिपोर्ट तसेच वाहन चालक आरोपीचे ब्रिथ अल्कोहोल रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४,१८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**९) अवैधरित्या जनावरांना कोंडुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०२/०५/२०१८ चे १०.०० वाजता दरम्यान यातील आरोपी हा स्वत:चे वाहन क्र. सीजी ०४/जेए ७७३७ टाटा २५/५ ईएक्स किंमती १०,००,०००/—रु. मध्ये १५ म्हशी, १ वघार, ३ रेडे किंमती २,९०,०००/—रु. चा माल अवैद्यरित्या जनावरांची कोंडुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनि. तुळजेवार यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ११(घ)(ड)(च)(ज)प्रा. कृ.वा. अधी १९६० सहकलम ९ महा. प्रा. सं. अधी १९७६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**१०) युनिट विज चोरी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २५/०५/२०१८ चे १४.३० वाजता दरम्यान यातील नमुद विज मिटरचा वापर कर्ता आरोपी याने अवैद्यपणे मिटर बायपास करुन ५ महीण्याचा कालावधीत ८७८ युनिट विज चोरुन किंमती ८३४०/—रु. किंमतीचे आर्थीक नुकसान केले आहे. फिर्यादी यांनी दिनांक २५/०४/२०१८ रोजी १४.३० वाजता दरम्यान फिरते पथकासह आरोपीचे मिटरची तपासनी केली असता सदरविज चोरुन उघडकीस आल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट व तपासनी अहवाल स्थळ परिक्षण अहवाला वरुन सरतर्फे फिर्यादी सुधीर हिरामन हेडाऊ रा. फिरते पथक ग्रामीन म.रा.वि.वि.कंपनी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १३५ विद्युत कायदा २००३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**११) खात्यातुन पैसे काढुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०१/०५/२०१८ चे १५.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीला आरोपीने मोबाईल नंबरवरुन फिर्यादीचे मोबाईवर अकांऊट नं. ओटीपी व एटीएम नं. ची विचारणा करुन ते फिर्यादीचे मुलीने सांगीतले असता आरोपी याने फिर्यादीच्या व फिर्यादीच्या पत्नीच्या अश्या दोन्ही बचत खात्यातुन ३९,९९८/—रु. व २४,९९९/—रु. असे पैसे काढुन फिर्यादीची फसवणुक केल्याने फिर्यादी शंखपाल देवाजी तिरपुडे वय ४५ वर्ष, रा. तुलसी नगर खात रोड भंडारा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ६६(क) आय टी अक्ट. सहकलम १२० भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. ऊईके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**१२) इसमाचा मृत्यु :–**

दिनांक०१/०५/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील मृतक कळकाराम तुळशीराम मंगर वय ६३ वर्ष, रा. पालेपेंढरी हा प्रकृती चे कारणावरुन हातात कुऱ्हाड लाठी घेवुन कोणास तरी मारतो, असे म्हणुन पळला असता कॅनलजवळ स्वत: पडून जखमी होवुन त्यास उपचारा साठी त्याचे मुलाने प्राथमीक आरोग्य केन्द्र सरांडी बुज नंतर ग्रा. रु. लाखांदुर येथे उपचार घेवुन घरी परत येवुन मरण पावला फिर्यादी घनश्याम लिलाधर चौधरी वय ५० वर्ष,रा. पालेपेंढरी पोलीस पाटील यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. सुनगार पोलीस स्टेशन पालांदुर करीत आहेत.

**१३) दारू पिवुन वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०२/०५/२०१८ चे २०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी स्टॉपसह ड्रंक ॲन्ड ड्रायव्हु कसेस करीता गेले असता यातील आरोपीने चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही दारु पिवुन दारुच्या नशेत बाजार चौक वरठी येथे चालवितांना मिळुन आल्याने त्याचे दारु पिल्या बाबतचा परिक्षण केले असता वैद्यकीय तपासणी अहवाल वरुन सरतर्फे फिर्यादी पोना. शेंडे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. शेंडे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**१४) दारू पिवुन वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

**अ)**दिनांक ०२/०५/२०१८ चे ०९.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही दारु पिवुन दारुच्या नशेत कलेक्टर चौक भंडारा येथे चालवितांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल अनालायझर मशीन व्द्ारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. हटवार वानीशा भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गजभिये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**ब)** दिनांक ०२/०५/२०१८ चे ११.२५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही दारु पिवुन दारुच्या नशेत पोस्ट ऑफीस चौक भंडारा येथे चालवितांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल अनालायझर मशीन व्द्ारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. हटवार वानीशा भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गजभिये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**१५) दारू पिवुन वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०२/०५/२०१८ चे १८.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टाटा एस गाडी ही दारु पिवुन दारुच्या नशेत किटाळी फाटा येथे चालवितांना मिळुन आल्याने त्याचे वैद्यकीय केली असता दारु पिल्याबाबतचे वैद्यकीय अहवाला वरुन सरतर्फे फिर्यादी पोउपनि. डोंगरे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. डोंगरे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**१६) अवैध हातभट्टी दारु /जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक ०२/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर, कारधा, व भंडारा येथे अवैध हातभट्टी /जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २५० लिटर हातभंट्टी दारू ५००० किलो सडवा किंमती ६,७१,५००/रु. तसेच जुगारातुन ३६५/रु. असा एकुण किंमती ६,७१,८६५/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०२/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक– ०३ तीन सिटर वाहनाकरीता– ०५ ईतर वाहनांवरती – ११५ केसेस करण्यात आले आहे.


**(मपोउपनि.प्रणती लांजेवार)**
**माहिती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**


प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.